Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

32

# मराठी साहित्य आणि स्त्री

**प्रा. वैशाली पांडुरंग पाटील**
(मराठी विभाग)
बी. पी.आर्ट्स, एस. एम. ए. सायन्स, आणि के. के. सी. कॉमर्स कॉलेज धुळे रोड, चाळीसगाव.

---

**प्रस्तावना**

स्त्रीने जीवनाच्या विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचे पंख पसरले किंबहुना असे एकही क्षेत्र आज सांगता येणार नाही की जिथे स्त्रीने पदार्पण केले नाही.शिक्षण, संशोधन ,ललित कला ,वैद्यक , कृषी ,विज्ञान, राजकारण, समाजकारण इत्यादी सर्वच क्षेत्रात स्त्रीच्या कर्तुत्वाची आज नाम मुद्रा उमटलेली आहे. स्त्रीच्या अनुभवाचे क्षेत्र खूपच विस्तारले त्याचे चित्र साहित्यातही उमटले स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये संख्यात्मक बरोबरच गुणात्मक वाढही झालेली दिसते. कविता, कथा , चरित्र,आत्मचरित्र, एकांकिका ,ललित गद्य, संपादन इत्यादी साहित्य प्रकारात स्त्रियांनी लेखन केलेले दिसते. (स्त्री साहित्याचा मागोवा पृ.क्र. १७)

एक स्त्री म्हणून आजच्या काळात जीवन जगत असतांना साहित्याचा विचार करता आणि अभ्यासाच्या दृष्टीने मागे वळून पार्श्वभूमी पाहता प्राचीन काळापासून आजतागायत स्त्री जीवनाच्या विकासाची वाटचाल शोधत असतांना असे निदर्शनास येते की पूर्वी पितृसत्ता पद्धतीच्या बंदिस्तपणामुळे सर्जनशीलता ही फक्त पुरुषांचीच मक्तेदारी होती. स्त्रियांना साक्षर होण्याची मुभा नव्हती त्यामुळे स्त्रियांच्या लेखनाला मर्यादा पडल्या होत्या, पूर्वी स्त्रियांना शिक्षणाचीही संधी न मिळाल्यामुळे त्यांना नेहमीच पुरुषी वर्चस्वाला सामोरे जावे लागत होते, यावर विस्मृतीत गेलेल्या लेखिकांचे पुनर्लेखन करणारी, स्त्री विषयक अनुभवांचे, स्त्रियांचे लेखन प्रकाशात आणणारी साहित्यात नवा स्त्रीवादी समीक्षेचा मार्ग आखणारी 'व्हर्जिनिया उल्फ' म्हणते "स्त्रियांना अधिक व्यापक अनुभवाचे क्षेत्र लाभत नसल्यामुळे त्यांच्या निर्मिती क्षमतेवर अनेक मर्यादा पडतात" म्हणजेच स्त्रियांना जर विस्तृत अनुभव क्षेत्र लाभले, सामाजिक, आर्थिक, पर्यावरण लाभले तर अत्यंत उत्स्फूर्त अशा नवनिर्मितीचे कार्य तिच्या हातून होऊ शकते कारण लिंगभेद हा साहित्याची गुणवत्ता ठरवण्याचा निकष असू शकत नाही हे निश्चितच. ॲरिस्टॉटल, सिग्मंड फ्राईड, रुसो यासारख्या तत्त्वज्ञांनी देखील स्त्रीला निष्क्रिय संबोधले आणि समाजात पुरुषांपेक्षा कमी लेखले. 'शरीर हीच तिची नियती असते' असे 'सिग्मंड फ्राईड' म्हणतो, तर लोकशाहीचा पुरस्कर्ता 'रुसो' हा स्त्रीला पुरुषापेक्षा कमी लेखतो. (स्त्रीवादी साहित्याचा इतिहास पृ.क्र.९ )

अशा प्रकारे स्त्रीकडे फक्त 'बाई' म्हणूनच पाहिले गेले तिचे मानवपण नाकारून तिला सामाजिक न्यायापासून वंचित ठेवण्यात आले. 'स्त्री' म्हणजे जिवंत जीव नसून पुरुषाच्या तालावर नाचणारी बाहुली, केवळ उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले गेले स्त्रीला आपल्या जीवनात मुलगी ,पत्नी, सून, बहीण ,आई, सासू अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. आपल्या इच्छा आकांक्षा दाबून पुरुषी अन्याय अत्याचार सहन करूनही ती कुटुंबाला प्रकाशमय करते.

19 व्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी केले पाहिजे असा विचार मांडण्यास सुरुवात झाली. रुढी-परंपरा, अन्याय -अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रत्यक्षात काही समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. भारतात पितृसत्ताक पद्धती असल्यामुळे लग्नानंतर मुलगी सासरी जाते आपले घरदार, मुलाबाळांना सांभाळते म्हणूनच आपल्या जबाबदाऱ्या ओळखून आपले कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढ्या पुरतेच मर्यादित ठेवले.समाज सुधारकांच्या कार्यामुळे स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या त्यामध्ये 'स्त्रीवादी साहित्य' हा नवा वांग्मय प्रकार उदयास आला. वांग्मय व्यवहारात आणि विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात स्त्रीवादी भूमिकेने स्थान मिळवायला प्रारंभ केला. स्त्रियांच्या कविता, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्र इत्यादी साहित्याची दखल अधिक आस्थेने घेण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस गेली .

**स्त्रीवाद (Feminism)**

स्त्री साहित्याचा विचार करण्यापूर्वी आपण स्त्री वादावर एक दृष्टिक्षेप टाकणे गरजेचे आहे, कारण यापासून खऱ्या अर्थाने स्त्री साहित्य प्रकाश झोतात आले. 'स्त्रीवाद' ही एक आधुनिक विचारप्रणाली आहे. याचा अर्थ ही विचारधारा किंवा हे साहित्य केवळ स्त्री निर्मित आणि स्त्री साहित्य आहे असा होत नाही, तर स्त्रीच्या दृष्टिकोनातून प्रत्येक गोष्टीचे अवलोकन करून स्त्री देखील एक स्वतंत्र व्यक्ती आहे आणि व्यक्ती म्हणून जगत असतांना तिच्या जीवनाचे मूल्यमापन करून स्त्री- पुरुष यांच्यातील भेद दाखवून देते. स्त्रीला कनिष्ठ दर्जा व पुरुषाला श्रेष्ठ दर्जा हे नैसर्गिक नसून या सर्व गोष्टी पुरुषांनी निर्माण केलेल्या आहेत स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांनी या सर्व रूढी कल्पनांची रचना केलेली दिसून येते. भारतीय संस्कृत परंपरेने चालत आलेली समाज जीवनातील स्त्री- पुरुष असमानतेची विचारप्रणाली पुसून पुरुषांप्रमाणेच स्त्री देखील एक सक्षम आणि बुद्धीच्या बाबतीत पुरुषांइतकीच तल्लक आणि हुशार आहे त्यामुळे

जुन्या परंपरांना लाथाळून नव समाजाची निर्मिती केली पाहिजे. या नव समाजात स्त्री पुरुष असमानतेचा आचार विचार नसला पाहिजे. असा नव समाज निर्माण करण्यासाठी विविध मार्गाचा शोध घेणे हे स्त्रीवादी साहित्याच्या विचारप्रणालीचे स्वरूप आहे. सर्वच क्षेत्रात स्त्री- पुरुष समानता असली पाहिजे.

**स्त्री लिखित साहित्य :**

**कविता**

'स्त्री' आज कोणत्याही क्षेत्रात मागे राहिलेली नाही सर्व क्षेत्रात ती उत्तुंग भरारी घेताना दिसते, साहित्य क्षेत्रात देखील तिने आपल्या प्रतिभा शक्तीची छाप सोडली अगदी सुरुवातीपासूनच विचार केला तर स्त्रीने आपली सुख-दुःख, अशा- आकांक्षा व्यक्त केल्या त्या प्रथम कवितेतूनच 'साने गुरुजी' म्हणतात, की "स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला तो कवितेतून, कविता ही तिची सखी जात्यावर दळतांना कांडतांना, झोके घेताना, कविता हीच तिची सहचरी होते तिचे विश्व होते चुल आणि मूल,सासर आणि माहेर या विश्वात तिच्या वाट्याला कधी वेदना, कधी श्रावण सरींचे सुख आले. जे वाट्याला आले ते तिने कवितेच्या करंड्यात जपले."( साहित्य दर्शन - पृ.क्र.१४.७)

ही 'अपौरुषय कविता' म्हणजे मराठी कवितेचे धन. एका मर्यादित विश्वात वावरत असणाऱ्या स्त्रीची कविता चित्त वेधून घेते. त्याचे कारण तिचा जन्म तिच्या जगण्यातून झालेला आहे, तिच्या विविध स्थितीचे चित्र या कवितेतून उमटत गेलेले आहे. लग्न, मुंज, बारसे, डोहाळे किंवा नागपंचमी, गौरी- गणपती, नवरात्र इत्यादी सण व उत्सवाच्या निमित्ताने 'स्त्री' चे दुथडी भरून आलेले मन कवितेतूनच गोचर होते.

प्राचीन मराठी कवितेची वाटचाल महानुभव पंथ, नाथ पंथ, वारकरी पंथ इत्यादीचे तत्त्वज्ञान मांडण्याच्या हेतूने प्रामुख्याने झालेली आहे. मराठी कवितेने अध्यात्म विवरुन सांगितले, नीती विचार मांडला आणि समाजातील दंभ,ढोंग,अन्याय खुळ्या समजुती यावर प्रहार केला. जेव्हा कविता अपुला आपुल्याशीच संवाद करीत जन्माला येत होती तेव्हा त्या कवितेला आगळे ऐश्वर्य लाभत होते .जीव, जगत व ईश्वर यांच्यात परस्पर संबंध आहे काय? हा जसा तिला प्रश्न पडला होता तसा मी कोण? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचीही या कवितेला ओढ होती ,प्राचीन मराठी कविता ईश्वरास मानवी व्यवहारांचा केंद्रबिंदू मानून त्या सर्व शक्तिमान परमेश्वराच्या रूपाचा शोध घेण्यात धन्यता मानत होती. या काळात इतर संत कवी प्रमाणे आद्य कवियित्री 'महदंबा' ज्यांनी ढवळ्यांची निर्मिती केली त्यांच्यापासून ते संत कवयित्री मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, प्रेमाबाई, बहिणाबाई या कवयित्री विरक्त वृत्तीनेच जगत होत्या. त्यांनी पंथीय विचारापलीकडे नवा विचार मांडला नाही, की पंथीय तत्त्वज्ञानाचा नवा अर्थ सांगितला नाही, मात्र विठ्ठल भक्ती व कृष्ण भक्तीचा महिमा गातांना त्यांचीही स्त्रीच्या अनुभवाची भाषा होती.

'स्त्री जन्म म्हणुनी न व्हावे उदास' (साहित्यदर्शन पृ.क्र. ४८) अशी त्यांची वृत्ती होती. म्हणून आपण स्त्री आहोत याचा त्यांना निषाद वाटत नाही प्रपंच मागे टाकून परमार्थाच्या वाटेवर आलेल्या या स्त्रिया भक्तीत रंगल्या होत्या.आपल्या मनातील दाटून आलेला भक्ती भाव त्या स्त्रिया आपल्या कवितेतून व्यक्त करतात. धवळे रचनाकार महादंबा काय किंवा 'येगं येगं विठाबाई! माझे पंढरीचे आई!' असा विठ्ठलाचा धावा करणारी जनाबाई काय किंवा 'रामनामविण मज कंठवेना' असे सांगणारी वेणाबाई काय अखेर ईश्वराला समर्पण वृत्तीनेच भजतात.

**" मुंगी उडाली आकाशी I तिने गिळीले सूर्यासी"**

(साहित्य दर्शन पृ.क्र. १४.८)

अशी चमत्कृती पूर्ण रचना करणाऱ्या मुक्ताबाईचा परमार्थिक अधिकार मोठा होता त्यांचा अपवाद वगळता सर्व स्त्रियांची कविता अतिशय पारदर्शी आहे वेणाबाईचे 'सीता स्वयंवर' वाचा किंवा महदंबेचे 'धवळे' वाचा त्यातून स्त्री जीवनाचा रम्य अविष्कार होतो. त्यांनी परमेश्वर कधी आईच्या, कधी पतीच्या, तर कधी बालकाच्या रूपात पाहिला परमेश्वराचे वर्णन करतांना त्या देहभान हरपतात.

**" चालता पाऊली पंढरीच्या वाटे I ब्रह्म सुख भेटे रोकडेचिII "**

(साहित्य दर्शन पृ.क्र. १४.८)

असे जेव्हा बहिणाबाई म्हणतात, तेव्हा साक्ष पटते. ब्रह्मसुखाच्या दिशेने झेपावणाऱ्या या कवितेचा घाट मन प्रसन्न करून टाकतो.

19 वे शतक उजाडले आणि 'केशवसुतांच्या' नवकाव्याला सुरुवात झाली. अनेक स्थित्यंतरे झाली विज्ञान निष्ठेचा उदय झाल्यामुळे कवितेकडे पाहण्याची नवी दृष्टी केशवसुतांनी दिली सर्व जीवन व्यवहारांचे केंद्र माणूसच आहे आणि मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. या विचारांचा जन्म याच कालखंडात झाला. या काळात मनुबाई बोरकर- फेरांची गाणी, लक्ष्मीबाई बेहेरे,

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

शारदाबाई परांजपे इत्यादी कवियित्रीं पेक्षा या कालखंडात लक्ष्मीबाई टिळकांची कविता लक्ष वेधून घेणारी ठरली. त्यांच्या कवितेला स्वतःचा देखणा सूर लाभला.

**“म्हणे जातो सोडून नाथा माझा**
**अता कवणाला बाहु देवराजा**
**सर्वव्यापी सर्वज्ञ तूचि आहे**
**सांग कवणाचे धरू अता पाये”**

(साहित्यदर्शन - पृ.क्र. १४.८)

या काळात केशवसुतांनी आणि इतर काही कवींनी जे मराठी काव्यात परिवर्तन घडवून आणले ते स्री जगतात उमटले नाही. स्री शिक्षण वाढू लागले स्त्रियांना छळणाऱ्या प्रवृत्ती विरुद्ध प्रतिक्रिया उमटू लागली, पारंपारिक पद्धतीने स्त्रिया काव्यरचना करीत होत्या पण केशवसुतांची काव्यदृष्टी जाणून या नव्या प्रवाहाशी संवाद साधेल असा सूर लक्ष्मीबाई टिळकांचा अपवाद वगळता कुणीही स्त्रीने व्यक्त केला नाही.

1920 ते 1947 या काळात ‘मनोरमाबाई रानडे’ या कवितेचा आस्वाद आणि कवितेची चिकित्सा परखडपणे मांडतात.त्यांच्या कवितेमागे एक समंजस दृष्टी आहे. स्त्रियांचे मनोव्यापार व मनोविकार यांचे दर्शन स्त्रीच सहज घडवू शकेल. आपल्या आजाराची असाध्यता लक्षात आल्यावर त्या एका कवितेत लिहितात.

**“मना आता गुंतशी का भवात?**
**धरी दृढता: स्थिर होई आणि शांत**
**तुझ्या वाचोनी अडूनि काय राही**
**तुझी नंतर स्मृती नामशेष होई.”**

(साहित्यदर्शन- पृ.क्र.१४.१०)

‘बहिणाबाई चौधरी’ यांची गाणी हा ही मराठी कवितेतील चमत्काराच.बहिणाबाईंची अस्सल जातिवंत कविता जन्माला आली. एका शेतकरी कुटुंबातील निरक्षर स्री पण त्यांचा जीवनानुभव केवढा उंचीचा होता हे त्याच्या काव्य रचनेतून कळते. विठोबाचे अन रामाचे मंदिर याच त्यांच्या शाळा, घरातले व शेतातले काम करता –करता, दळण दळता -दळता त्यांच्या अंत:करणात काव्य जन्मले.आणि त्यातूनच जीवनाचे तत्त्वज्ञान सांगून ज्ञानामृत पाजले. मन, शेतकरी, सासर, माहेर, नशीब , पेरणी इत्यादी त्यांच्या काव्यांचे विषय झाले.

**“मन पाखरू पाखरू त्याची काय सांगू मात?**
**आता व्हत भुईवर गेलं गेलं आभायात.”**

(बहिणाबाईंची गाणी पृ.क्र.२५)

अशाप्रकारे मन वढाळ आहे, मन मोकाट आहे, जहरी आहे, चंचल आहे असं त्या सांगतात.

या कालखंडात राधाबाई दांडेकर, यमुनाबाई नागपूरकर, अन्नपूर्णाबाई दीक्षित, कृष्णाबाई गाडगीळ इत्यादींनी काव्य लिखाण केले पण ‘रमाबाई’ आणि ‘बहिणाबाई’ यांचे लिखाण लक्षणीय ठरले. तसेच ‘संजीवनी मराठे’ यांचीही कविता लोकप्रियता आणि कौतुक मिळविणारी ठरली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक स्थित्यंतरे होऊन कवितेत नव्या जाणीवा जन्माला आल्या स्त्रियांच्या कवितेतून हळवे थरथरते भावविश्व जन्माला आले. कविताही प्रेमानुभवाच्या वर्तुळात फिरत आहे हेही लक्षात येते. कुटुंबातील नातेसंबंध, ताण -तणाव ,सुख- दुःख, आशा- आकांक्षा, दलितांचे दुःख इत्यादी कवितेचे विषय झाले. यात शांताबाई शेळके, संजीवनी मराठे, इंदिरा संत, पद्मा गोळे, शिरीष पै, प्रभा गणोरकर, सुशीला पगारिया, पद्मा लोकूर, अंजली ठकार इत्यादींनी काव्य लेखन केले. आणि आपल्या काव्य लेखनातून नात्यातील कोमलता, हळवेपणा, नाजूक आठवणी रंगविल्या. पद्मा गोळे यांच्या ‘आईपणाची ओवी’ या कवितेत बदलत्या सामाजिक समाजव्यवस्थेत आईची होणारी दुर्दशा अधिक समर्पकतेने व्यक्त होताना दिसते.

कवयित्री ‘नीरजा’ यांची कविता स्त्रीच्या दुःखानुभवांचे विविध पाने उलगडतांना दिसून येते. स्त्री दुःख हे तिच्या स्त्री होण्यात आहे हे त्यांच्या पुढील कवितेच्या ओळीतून दिसते त्या म्हणतात.

**“ती वयात येते I तेव्हाच संपून जाते**
**उंच उंच झोके I अन सागर गोटे**

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

**मागील दारी I आणि पुढयात भरजरी साडी**
**पुढील आयुष्याचे लक्तरांचे I आमंत्रण म्हणून...”**
(स्त्रीवादी साहित्याचा इतिहास पृ.क्र. ४७)

स्त्रीचे दुःख आणि लोकगीत याचा जवळचा संबंध आहे. कारण स्त्रीच्या लोकगीतांमधून तिच्या भावनांची, व्यथांची निर्मिती होतांना दिसून येते. त्यामुळे लोकगीत आणि स्त्रीजीवन यांचा जन्म -जनक संबंध आहे .असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.लोकसाहित्याच्या प्रांतात ‘सरोजिनी बाबर’ यांची कामगिरी भरीव आहे. यांच्यामुळेच स्त्रीधन उजेडात आले. आणि मौखिक साहित्यची मौलिक परंपरा समाजापुढे आली.

प्रत्येक स्त्रीची आजूबाजूची परिस्थिती वेगळी, पर्यावरण वेगळे, कुटुंब व्यवस्था वेगळी, दुःख भोग वेगळा पण जात एकच ‘स्त्रीची’ मलिका अमर शेख, रजनी परुळेकर, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, कविता महाजन, उषा अत्राम, प्रतिभा टेपाळे या सर्व कवयित्रींनी आपल्या कवितेतून स्त्रीच्या वेदनांवर फुंकर घातलेली दिसून येते.

**कथालेखन**

स्त्रीला सर्व क्षेत्रे मोकळी झाली असली तरी आजवर भोगलेल्या सर्व दुःखांचे, वेदनांचे, अन्याय, अत्याचारांचे चित्र पूर्वीपासून ते आजपर्यंत कथा लेखनात उमटतांना दिसते. ‘काशीबाई कानिटकर’ या मराठीतील पहिल्या कथालेखिका म्हणून ओळखल्या जातात त्यांचा ‘चांदण्यातील गप्पा’ कथासंग्रह प्रसिद्ध आहे. 1933 साली ‘विभावरी शिरूरकर’ यांचा ‘कळयांचे निश्वास’ हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. प्रौढ कुमारिकांचे जीवन विषयक वास्तव आणि त्यांचा मानसिक कोंडमारा यांचे मनोविश्लेषणात्मक दर्शन विभावरी शिरूरकरांच्या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. कथा लेखिका म्हणून विजया राज्याध्यक्ष, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, कमल देसाई इत्यादींनी लेखन केलेले दिसते.

**कादंबरी लेखन**

समाजातील अनेक स्थित्यंतरांचा परिणाम स्त्रीजीवनावरही झाला, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक स्थित्यंतरांमुळे स्त्रीच्या भाव जीवनात कोणकोणते बदल झाले त्याची मीमांसा स्त्रीलेखिकांनी ‘कादंबरी’ या साहित्य प्रकारातून अधिक प्रभावीपणे केल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ - ‘यशोदाबाई भट’ – ‘मुलांचे बंड’, ‘विभावरी शिरूरकर’- ‘हिंदोळ्यावर’ तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडात उच्च स्थान मिळविणाऱ्या स्त्रीकादंबरीकारांमध्ये ‘ज्योत्सना देवधर’यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. शैलजा राजे – ‘खणा नारळाची ओटी’, आशा बगे- ‘त्रिदल’ गौरी साने, सानिया इत्यादी लेखिकांनी कादंबरी लेखनास योगदान दिले.

**आत्मचरित्र**

‘आत्मचरित्र’ या साहित्य प्रकारातही स्त्रियांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. स्त्रियांनी जी आत्मकथने लिहिली त्यात आपले जीवनानुभव तर त्यांनी मांडलेच पण त्यातच त्यांनी आपल्याला घडविणाऱ्या महान पुरुषांबद्दल अपार कृतज्ञता ही व्यक्त केली. उदाहरणार्थ : पार्वती बाई आठवले- ‘माझी कहाणी’ या आत्मचरित्रात महर्षी कर्वे बद्दल महती व्यक्त करतात. रोहिणी भाटे – ‘माझी नृत्य साधना, हंसा वाडकर- ‘सांगते ऐका’, रमाबाई रानडे- ‘आमच्या आयुष्यातील काही आठवणी’,स्नेहप्रभा प्रधान- ‘स्नेहांकिता’ इत्यादी.लेखिकांनी आत्मचरित्राचे दालन समृद्ध केले.

**नाटक**

‘नाटक’ हा साहित्य प्रकारही स्त्री लिखाणाच्या बाबतीत मागे राहिलेला नाही. मध्यमवर्गीय स्त्रीजीवनातील विशेषता कौटुंबिक नात्यातील सासू – सुन संघर्ष, हुंडा प्रथा, आधुनिक स्त्रीचे वर्तन, नव्या - जुन्या पिढीतील संघर्ष, प्रेम विवाह प्रथा’ पुरुषांचे विवाहबाह्य संबंध, कुमारीकांचे प्रश्न, नवऱ्याचा जाच इत्यादी स्वरूपाचे वेगवेगळे विषय हाताळून स्त्रीलिखित नाटके प्रामुख्याने आली. ‘मालतीबाई दांडेकर’ या महत्त्वाच्या नाटककार आहेत. मालतीबाई दांडेकर- ‘ज्योती’, तारा बनारसे –‘कक्षा’, उमाबाई भट –‘पत्त्यांचा बंगला’, गिरजाबाई केळकर- ‘मंदोदरी’ इत्यादी नाट्यसंपदा सांगता येईल.

**निष्कर्ष-** अशाप्रकारे स्त्रियांनी कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, एकांकिका, वैचारिक लेखन, संपादन, ललित लेखन इत्यादी साहित्य प्रकारात अधिक समृद्धपणे स्त्रीजीवनाची मांडणी केलेली दिसून येते. स्त्रीजीवनाच्या अनेक दुःखांचे पडदे या साहित्य प्रकारांनी उचललेले दिसून येतात. तसेच स्त्री जीवनात सुरवातीपासून ते आजतागायत होणाऱ्या स्थित्यंतरांचा मागोवा त्यांनी वरील साहित्य प्रकारातून घेतलेला आढळतो. अशाप्रकारे सदैव पुरुष केंद्री समाज व्यवस्थेच्या वरवंट्याखाली स्त्री वर्षानुवर्षे भरडली गेली. परंतु तरीही तिने आपले अस्तित्व निर्माण केले.

**सारांश**

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

अशाप्रकारे महादंबेपासून कान्होपात्रा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई इत्यादी संत कवयित्री तसेच लक्ष्मीबाई टिळक, ताराबाई शिंदे, गौरी देशपांडे, सानिया इत्यादींसारख्या अनेक कवयित्रींनी आणि लेखिकांनी कविता, कथा, कादंबरी, ललित लेखन, आत्मचरित्र,नाटक इत्यादी सारख्या अनेक साहित्य प्रकारातून मध्ययुगीन काळापासून ते आजपर्यंत अनमोल असे लिखाण करून ‘स्त्रीसाहित्य’ समृद्ध केले. स्त्रीवादी साहित्यात स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते असे म्हटले जाते, मराठी साहित्य प्रकारांमधून स्त्रीजीवनाचे खऱ्या अर्थाने दर्शन घडविता येते, स्त्रीजिवनातील असा एकही विषय नाही की ज्याला स्त्रीलेखिकांनी स्पर्श केला मग तो विषय कुठलाही असो बाळंतपण, विध्वेची स्थिती, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, घटस्फोटाचा प्रश्न,प्रौढकुमारी, प्रेमात मिळालेली विफलता, नवऱ्याचा जाच, इत्यादी अशा अनेक विषयांनी भरलेले स्त्रीजीवन साहित्यात उमटलेले दिसून येते. आणि हे स्त्रीजीवन खऱ्या अर्थाने मांडण्याचे श्रेय पुरुष लेखकांनाही दिले जाते त्यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन अनेक स्त्रीलेखिकांनी लेखनाला सुरुवात केली आणि आपल्या मनात उमळून आलेल्या भावनांना व्यक्त करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. आजपर्यंत स्त्रियांच्या स्त्रीदास्य विमोचनाचे सूत्र मराठी स्त्रीसाहित्यामधून सातत्याने मांडले गेले. स्त्रीसाहित्याने प्रत्येक काळात या सूत्राकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघितले आहे. या प्रक्रियेत मराठी साहित्यातील स्त्रीचे सामाजिक स्थान बदलते दिसून येते, स्त्रीच्या कुटुंबाकडून असलेल्या अपेक्षा आणि कुटुंबाच्या स्त्री कडून असलेल्या अपेक्षा, स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन, पुरुषाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि स्त्रीची स्वतःच्या कर्तुत्वाविषयीची धारणा या कक्षामध्ये मराठी साहित्य स्त्रीसाहित्याच्या वाटचालीत बदल होणे अपरिहार्य होते मराठी साहित्यात या बदलाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते.

महिलांच्या विकासासाठी कार्यरत असणारे ‘भारती विद्यापीठ’ साहित्य प्रेमी भगिनी मंडळाच्या’ सहकार्याने स्त्रियांचे साहित्य समाजापुढे आणत आहे.हे स्त्री साहित्याला नक्कीच प्रेरणादाई ठरेल .

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. खांडगे, मंदा, लीला दीक्षित, अरुणा ढेरे, आणि विनया खडपेकर, संपादक. *स्त्री साहित्याचा मागोवा – खंड २.* मार्गदर्शक डॉ. सरोजिनी वैद्य, प्रथम आवृत्ती, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, प्रतिभा प्रकाशन, २००२, पृ. १४, १७.
2. भामरे, सोनल. *स्त्रीवादी साहित्याचा इतिहास.* प्रथम आवृत्ती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, मार्च २०१५, पृ. १५, ४७, ५५.
3. गायकवाड, दिलीप भीमराव, प्रतिभा वाघ, आणि उमा काळे. *साहित्य दर्शन.* प्रगती प्रकाशन, पृ. १४.२, १४.७, १४.८.
4. इर्लेकर, सुहासिनी. *संत कवी आणि कवयित्री: एक अनुबंध.* संस्कारित आवृत्ती, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट २००६.
5. चौधरी, बहिणाबाई. *बहिणाबाईंची गाणी.* प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, आवृत्ती ऑगस्ट २०१८, पृ. २५.